तात्काळ/ अर्थसंकल्प प्राथम्य

महाराष्ट्र विनियोजन अधिनियम, २०२६
निधी वितरण...

**महाराष्ट्र शासन**
**वित्त विभाग**
**शासन परिपत्रक क्र. अर्थसं-२०२६/प्र.क्र.४०/अर्थ-३**
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई- ४०० ०३२.
**दिनांक :- ०७ मे, २०२६**

वाचा: - शासन परिपत्रक, वित्त विभाग, समक्रमांक दिनांक ०९ एप्रिल, २०२६.

## परिपत्रक

दि. ०९ एप्रिल, २०२६ च्या शासन परिपत्रकातील परिच्छेद क्र. ३ मध्ये खालील प्रमाणे नमूद केले आहे:-

खालील नमूद योजनांसाठीचा निधी राज्याच्या एकत्रित निधीमध्ये जमा झाल्याची खात्री संबंधित विभागाने वेळोवेळी करून घ्यावी व तद्नंतर सदर निधी विहित मुदतीत वितरीत करण्यासाठीचे प्रस्ताव संबंधित मंजूरी आदेश/ कागदपत्रे यासह थेट वित्त विभागास सादर करावेत.

- केंद्र पुरस्कृत योजनेतील केंद्र व समरूप राज्य हिस्सा
- केंद्र पुरस्कृत SNA स्पर्शवर ऑनबोर्ड झालेल्या योजनांबाबत केंद्र शासनाने मंजूर केलेल्या मातृ मंजूरीच्या (Mother Sanction) मर्यादेत केंद्र व राज्य हिस्सा

२. केंद्र पुरस्कृत योजनांचा केंद्र हिस्सा व राज्य हिस्सा १००% निधी आता वितरित करण्यात येत आहे. यासाठी विभागांनी नस्ती वित्त विभागास सहमतीसाठी वेगळ्याने संदर्भीत करण्याची आवश्यकता नाही. सदरचा निधी वितरित करताना विभागांनी खाली बाबी विचारात घेऊन पुढील निधी वितरणाची कार्यवाही करावी.

i) केंद्र पुरस्कृत SNA स्पर्शवर ऑनबोर्ड न झालेल्या योजनांबाबत केंद्र शासनाने वितरीत केलेला निधी राज्याच्या एकत्रित निधीमध्ये जमा झाल्याची खात्री करण्याबाबत वित्त विभाग, शासन परिपत्रक क्र. संकीर्ण-१०१८/प्र.क्र.४६/अर्थोपाय, दि. ०५ डिसेंबर, २०२३ मध्ये नमूद करण्यात आल्यानुसार कार्यवाही करण्यात यावी.

ii) केंद्र पुरस्कृत SNA स्पर्शवर ऑनबोर्ड झालेल्या योजनांबाबत केंद्र शासनाने मंजूर केलेल्या मातृ मंजूरीच्या (Mother Sanction) मर्यादेत निधी वितरीत करताना विभागांनी मातृ मंजूरी (Mother Sanction) प्राप्त झाली आहे याची तपासणी / खातरजमा करुनच केंद्र व समरुप राज्य हिश्श्याच्या निधीचे वितरण करावे.

३. वरील प्रमाणे केलेल्या कार्यवाहीची माहिती वित्त विभागास अवगत करावी.

सदर शासन परिपत्रक महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आले असून त्याचा संकेताक २०२६०५०७१७४५०१६६०५ असा आहे. हे शासन परिपत्रक डिजिटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

VIVEK RAMBHAJI DAHIPHALE

Digitally signed by VIVEK RAMBHAJI DAHIPHALE
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=FINANCE DEPARTMENT,
2.5.4.20=56142975484e58364afe88f5f0e3138e3ce0d4e4058e42f003dfd69500064afb, postalCode=400032, st=Maharashtra,
serialNumber=3981A50612646983D580DEA2DA5FB52A33D8E6E3C4F34CD80F08C598711CEB65, cn=VIVEK RAMBHAJI DAHIPHALE
Date: 2026.05.07 17:46:38 +05'30'

**(वि.रं.दहिफळे)**
**सह सचिव, महाराष्ट्र शासन**

**प्रत,**

१) मा. राज्यपाल यांचे सचिव, लोकभवन, मलबार हिल, मुंबई,
२) मा. मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव, मंत्रालय, मुंबई,
३) मा. राज्यमंत्री (वित्त), यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई,
४) सर्व मा.मंत्री आणि मा.राज्यमंत्री यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई,
५) मा. मुख्य सचिव, महाराष्ट्र राज्य,मंत्रालय, मुंबई,
६) सर्व अपर मुख्य सचिव / प्रधान सचिव / सचिव, सर्व मंत्रालयीन विभाग, मंत्रालय, मुंबई,
७) सचिव, विधानसभा/विधानपरिषद, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, मुंबई,
८) सर्व सह सचिव / उप सचिव (अर्थसंकल्प शाखा), सर्व मंत्रालयीन विभाग, मंत्रालय, मुंबई,
९) उप सचिव (नोंदणी शाखा), वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई,
१०) विशेष आयुक्त, महाराष्ट्र सदन, कोपर्निकस रोड, नवी दिल्ली ११०००१,
११) प्रधान महालेखापाल - १/२ (लेखा परीक्षा), महाराष्ट्र, मुंबई/नागपूर,
१२) प्रधान महालेखापाल - १/२ (लेखा व अनुज्ञेयता) महाराष्ट्र, मुंबई/नागपूर,
१३) संचालक, लेखा व कोषागारे, मुंबई,
१४) अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई,
१५) निवासी लेखा अधिकारी, मुंबई,
१६) सर्व जिल्हा कोषागार अधिकारी,
१७) सर्व सह सचिव / उप सचिव / अवर सचिव/ कक्ष अधिकारी, वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई,
१८) निवड नस्ती, अर्थ-३, वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई.